दै. देशोन्नती दि. 10.10.25

# रात्री उशिरापर्यंत विनाकारण दुकाने उघडी ठेवल्यास खबरदार

## पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांचा इशारा



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** एकीकडे शासनाने रात्री दुकाने सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, परंतु कायदा व सुव्यवस्था लक्षात घेता शहरातील दुकाने रात्री १० वाजेनंतर विनाकारण उघडी ठेवल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला आहे.

शासनाने काही दिवसांपूर्वी राज्यातील दुकाने रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. अशा वेळी कायदा व सुव्यवस्था कायम ठेवणे हे पोलिस प्रशासनाची जबाबदारी आहे, त्याची आम्ही काळजी घेऊ असे मत पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी व्यक्त केले आहे. दरम्यान शासन निर्णयानुसार दुकाने रात्री उघडी ठेवण्यास पोलिस प्रशासनाचा विरोध नाही, परंतु विनाकारण पान टपरी, हॉटेल उघडी ठेवून केवळ गप्पा मारायच्या, मित्रांना एकत्र करायचे असे प्रयत्न कोणीही करू नये, त्याच प्रमाणे विनाकारण दुकाने रात्री उशिरापर्यंत उघडी ठेवू नये, रस्त्यावर फिरू नये असे आवाहन पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

दै. पुण्यनगरी.

# कोयता गँगच्या २ सराईत गुन्हेगारांना अटक

**मुखेड/ प्रतिनिधी**

पुणे शहरात कोयता गँगने धुमाकूळ घालून दहशत निर्माण केली आहे. या टोळीतील दोन सराईत गुन्हेगारांना मुखेड पोलिसांनी पाठलाग करून शिताफीने अटक केली आहे. तसेच या दोन्ही आरोपींना दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता पिंपरी चिंचवड पोलिसांच्या हवाली केले आहे.

पोलीस सूत्राच्या माहितीनुसार, पुणे शहरात कोयता गँगने हैदोस घातला आहे. या गँगमधील दोन सराईत गुन्हेगार पिंपरी चिंचवडहून मुखेड मार्गे हैदराबादला जात असल्याची गोपनीय माहिती मुखेड पोलिसांना चिंचवड पोलिसांनी दिली. या दोन गुन्हेगाराविरुद्ध पुणे शहरात खून करणे, खुनाचा प्रयत्न करणे, लुटमार करणे, [illegible] गुन्हे दाखल असून ते मुखेड शहराच्या जवळ असल्याचे पिंपरी चिंचवड पोलिसांनी मुखेड पोलिसांना सांगितले. ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक लक्ष्मणराव केंद्रे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक गणेश माने यांनी पोहेकाँ भारता फंताडे, मारोती मेकलवाड, यादव इबितदार, संदीप चिंचोरे यांना सोबत घेऊन मुखेड बस स्थानकापासून नरसी मार्गावर या गुन्हेगारांचा पाठलाग करुन त्यांना शहराजवळील शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालयासमोर पकडले. या दोन्ही गुन्हेगारांना मुखेड पोलिस ठाण्यात आणून त्यांना पिंपरी चिंचवड पोलिसांच्या हवाली केले. ही घटना दि.८ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता घडली. या कुख्यात गुन्हेगारांची नावे मात्र पोलिसांनी दिली नाहीत.